ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख २२ जून, १९६० | अंक २५

## विविध माहिती

**रेल्वेच्या विकासासाठी कर्ज**—रेल्वेच्या विकासासाठी जागतिक बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाचा तपशील ठरविण्यासाठी भारताचे दोन प्रतिनिधी लवकरच अमेरिकेला जाणार आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत ह्या कामासाठी मिळणारें हें अखेरचें कर्ज आहे. ह्यापूर्वी ह्याच कामासाठी दोन कर्जे बँकेकडून मिळालीं आहेत. नव्या कर्जाची रक्कम २·४ कोटी रुपये असेल.

**काँग्रेसला घराची देणगी**—गुजरात राज्याचे मुख्य मंत्री डॉ. जीवराज मेहता ह्यांनीं अमरेली येथील आपल्या मालकीचें घर अमरेली जिल्हा काँग्रेस कमिटीला बक्षीस दिलें आहे. घराची किंमत ४० हजार रुपये आहे. डॉ. मेहता मूळ अमरेलीचे रहिवासी आहेत. अमरेली येथील महिला मंडळालाहि १० हजार रुपये किंमतीचें एक घर दुसऱ्या एका दानशूराकडून बक्षीस मिळालें आहे.

**तेल शुद्ध करण्यास नकार**—क्यूबांतील तेल शुद्ध करणाऱ्या तीन कारखान्यांनीं रशिअन तेल शुद्ध करण्यास नकार दिला आहे. त्यांपैकी दोन कंपन्या अमेरिकन असून एक ब्रिटिश मालकीची आहे. क्यूबाचे पंतप्रधान मि. फिडेल कॅस्ट्रो ह्यांनीं असा नकार देणें म्हणजे क्यूबाच्या क्रांतिकारी चळवळीला आव्हान आहे, असा इषारा दिला आहे.

**मानस सरोवराची यात्रा**—कैलास व मानस सरोवराची यात्रा करण्यासाठी भारताच्या नागरिकांनीं येऊं नये असा सल्ला ल्हासामधील हिंदी कॉन्सल जनरलला चीनच्या सरकारनें दिला आहे. ह्या यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूंना चीनकडून पूर्वीप्रमाणें सवलती व संरक्षण दिलें जाणार नाहीं असा ह्याचा अर्थ करण्यांत येत आहे.

**भारताच्या भांडवलाला वाव**—भारत सरकाच्या उद्योग व व्यापारखात्याचे उपमंत्री श्री. सतीश चंद्र आपल्या सिंगापूरच्या भेटींत असें म्हणाले कीं, सिंगापूरमधील भारतीयांनीं आपल्या जवळील भांडवल तेथेंच गुंतवावें. सिंगापूरमध्यें भारताच्या भांडवलाला चांगला वाव आहे. विशेषतः छोट्या उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविणें किफायतशीर होण्यासारखें आहे.

**उद्योगधंद्यांत सरकारचा हात**—खाजगी मालकीच्या मोठ्या उद्योगधंद्यांना लागणाऱ्या भांडवलाच्या कामीं केरळ सरकारनें सहकार्य करण्यास हरकत नाहीं, असें मत भारताच्या नियोजन समितीनें व्यक्त केलें आहे. केरळ राज्याच्या औद्योगिकरणाला ह्या निर्णयामुळें चांगली गति मिळेल असा अंदाज करण्यांत येत आहे. केरळमध्यें कम्युनिस्ट सरकार असतांना अशा सहकार्याला समितीनें हरकत घेतली होती.

**कुटुंबनियोजनाचें महत्त्व**—भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कुटुंबनियोजनाच्या प्रश्नाला अग्रस्थान देण्यांत येणार आहे. कुटुंबनियोजनासाठी राज्य सरकारांच्या मार्फत जे उपाय अमलांत आणावयाचे आहेत त्यांच्यासाठीं २५ कोटी रुपयांची तरतूद नियोजन समितीनें केली आहे. ह्या बाबतींत भारत-सरकारचें आरोग्य खातेंहि सहकार्य करील.

**मुंबईत टेलिव्हिजनची स्थापना ?**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत मुंबईत टेलिव्हिजनचें केंद्र उभारलें जाणार असल्याची वार्ता प्रसिद्ध झाली होती. पण केंद्रासाठी लागणाऱ्या परदेशीय चलनाचा प्रश्न अजून सुटला नसल्यानें ह्या बाबतींत अखेरचा निर्णय अद्याप घेण्यांत आलेला नाहीं, असें नभोवाणी-खात्याचे मंत्री श्री. केसकर ह्यांनीं जाहीर केलें आहे.

**हुबळी-धारवाड कॉर्पोरेशन**—हुबळी व धारवाड ह्या शहरांसाठी मिळून म्युनिसिपल कॉर्पोरेशन स्थापन करण्याची योजना म्हैसूरच्या सरकारनें तयार केली आहे. संकल्पित कॉर्पोरेशनच्या स्थापनेमुळें धारवाडच्या प्रगतीला अडथळा येण्याचा संभव आहे अशी भीति धारवाड मर्चंटस चेंबरनें व्यक्त केलेली आहे. पण सरकारनें असें होणार नाहीं अशी ग्वाही दिली आहे.

**नवीं सिनेमागृहें**—नव्या सिनेमागृहांच्या बांधणीबद्दल महाराष्ट्र सरकारनें आपले नियम थोडेसे सैल केल्याबद्दल अखिल भारतीय सिनेमा-थिएटर मालकसंघटनेचे अध्यक्ष श्री. कुका ह्यांनीं सरकारचें अभिनंदन केलें आहे. तथापि जुन्या सिनेमागृहांच्या मालकांना त्यांची सुधारणा करण्यासाठी सवलती देणें अधिक महत्त्वाचें आहे असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे.

**बंगाल सरकारचें अन्नखातें**—पश्चिम बंगाल सरकारनें राज्याचें अन्नखातें कायम करण्याचा निर्णय घेतला आहे. ह्या निर्णयामुळें सरकारच्या अन्नखात्यांतील नोकरांपैकी ४० टक्के नोकरांना आपल्या नौकरीची शाश्वति लाभणार आहे. आतां ह्या नौकरांना कायमचे नौकर गणण्यांत येईल.

**आदिवासींची पुनर्वसाहत**—तापी नदीवर उकाई येथें बांधण्यांत यावयाच्या धरणामुळें हजारों आदिवासी शेतकरी आपल्या जमिनींना व घरादारांना मुकणार आहेत. त्यांची पुनर्वसाहत करण्यासाठी गुजरात सरकार एका बोर्डाची स्थापना करणार आहे. उकाई धरणाच्या जागेजवळ जंगल साफ करण्यांत येत असून ही जमीन आदिवासींच्या संयुक्त-शेतीसंघटनांना देण्यांत येईल.

**धान्य साठविण्यासाठी गुदामे**—रशिआंत कॅस्पिअन समुद्राच्या ईशान्येकडील भूभागांत धान्य सांठविण्यासाठी प्रचंड गुदामे बांधण्यांत येणार आहेत. एक कोटी टन धान्य सांठवितां येईल इतकी गुदामे बांधण्यांत येतील. पडीक जमीन लागवडी-खालीं आणल्यामुळें रशिआंतील धान्याचें उत्पादन वाढत चाललें आहे.

**मंगला धरणासाठी जमीन**—काश्मीरच्या पाकिस्तान व्याप्त भागांतील मिरपूर जिल्ह्यांत मंगला धरणासाठी ८०,००० एकर जमीन ताब्यांत घेण्याचें पाकिस्तान सरकारनें ठरविलें आहे. जमीन ताब्यांत घेण्याचें काम करण्यासाठी मिरपूर येथें एक कचेरीहि उघडण्यांत आली आहे. घेण्यांत येणाऱ्या जमिनी-साठी पाकिस्तान सरकारला २६ कोटी रुपये द्यावे लागतील.


**प्लायवुडच्या कारखान्यांतील कामगार**—१९५२ च्या एम्प्लॉयीज प्रॉव्हिडंट फंड कायद्याच्या तरतुदी भारत सरकारनें प्लायवुडच्या कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांना लागू करावयाचें ठरविलें आहे. १९५२ सालीं हा कायदा फक्त सहा उद्योगधंद्यांना लागू करण्यांत आला होता. आतां त्याच्या कक्षेंत ४२ उद्योगधंदे आले आहेत.

**गुजरातमधील रस्त्यांची वाढ**—गुजरात राज्यांतील रस्त्यांचा विस्तार करण्यासाठी एक योजना आंखण्यांत आली असून तिला राज्य सरकारनें मंजुरी दिली आहे. योजनेसाठी ४ कोटी रु. खर्च करण्यांत येतील. पहिल्या पंचवार्षिक योजनेअखेर गुजरात राज्यांत १४,०६२ मैल लांबीचे रस्ते होते. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस आणखी ३,०३६ मैल लांबीचे रस्ते तयार होतील.

**अमेरिका–इंडोनेशिआ करार**—अणुशक्तीच्या शांततामय कार्यासाठी उपयोग करण्याच्या कामीं एकमेकांस मदत करण्याच्या करारावर अमेरिका व इंडोनेशिआच्या प्रतिनिधींनीं सह्या केल्या. इंडोनेशिआंत स्थापन करण्यांत यावयाच्या प्रायोगिक अणुभट्ट्यांसाठी अमेरिकेकडून अणुइंधन पुरविण्यांत येईल.


किर्लोस्कर स्थापना १८८८

सेल्फ प्रायमिंग पंप



सामान्यतः सर्व प्रकारच्या कामासाठी या पंपाचा उपयोग केला जातो. याला फूटव्हाल्वची आवश्यकता नाही. पंप चालविण्यास ५ हा. पॉ. लागते व २५ ते ५५ फूट टोटल हेड्वर दर मिनिटास १०० ते २१५ इंपीरीअल गेलन्स पाणी मिळूं शकते.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी (द. सातारा)

STUSA KM6/59



महाराष्ट्रांतील लहानमोठ्या उद्योगधंद्यांची आर्थिक अडचण तत्परतेनें दूर करून
महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासास संपूर्ण साह्य करणारी

(शिड्यूल्ड बँक) **दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें** (स्थापना १९३६)

मुख्य ऑफिस :—प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. (फोन नं. ६५६३)
मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १. (फोन नं. २५३४०८)

: संचालक मंडळ :

श्री. छोटालाल धरमसी जोशी (प्रोप्रायटर–कमलाकांत छोटालाल अँड को. (इम्पोर्टर्स, एक्स्पोर्टर्स मुंबई) अध्यक्ष.
श्री. गणेश उद्धव चितळे (सुपरिंटेंडेंट, पैसाफंड कांच कारखाना) उपाध्यक्ष.
श्री. गणेश रामचंद्र साठे (डायरेक्टर, साठे बिस्किट अँड चाकोलेट कं. लि. पुणें)
श्री. चिंतामण त्रिंबक चितळे (ऑ. सेक्रेटरी, पैसाफंड ग्लास वर्क्स, तळेगांव)
श्री. वासुदेव पांडुरंग वैद्य (इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनियर)
श्री. विनयकुमार नारायण सरदेसाई (मॅ. डायरेक्टर, एशियाटिक इंडस्ट्रिअल एजन्सीज लि. मुंबई)
श्री. सदाशिव कृष्णाजी भागवत (प्रोप्रायटर, राम एजन्सी) पुणें.
श्री. मोहनलाल हंसराज लुनावत (व्यापारी) पुणें.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★
मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाच्या नवीन योजनेबाबत समक्ष भेटा.
—वी. वाय्. पाठक, अॅ. मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. २१ जून, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## लोकसंख्येची वाढ म्हणजे बुभुक्षितांची भाऊगर्दी !

भारताचे वॉशिंग्टन येथील वकील श्री. एम. सी. छगला ह्यांनीं तेथील आपल्या एका भाषणांत अमेरिकेनें अन्नधान्याबरोबर संततिनियमन घडवून आणणाऱ्या पोटांत घेण्याच्या गोळ्याहि भारताला पाठवाव्या, अशी कळकळीची विनंती केली आहे. " भारतासारख्या अविकसित देशांना जी मदत देण्यांत येत आहे, तिच्यामुळें प्रलयकाल पुढें ढकलला जात आहे एवढेंच; ही आपत्ति अटळ आहे आणि अन्नाचा तुटवडा असणाऱ्या देशांना वैद्यकीय मदत देणें म्हणजे दुखणें आणखी वाढविणें आहे " असें मत व्यक्त केलें जात आहे, त्याला धरूनच श्री. छगला ह्यांचे उद्गार आहेत.

चॉकोलेटचे कारखानदार 'नेसल', ह्यांनीं वेव्ही (स्विट्झरलंड) येथें " येत्या ५० वर्षांतील लोकसंख्येची प्रवृत्ति " ह्या विषयावर एक परिसंवाद नुकताच घडवून आणला. त्यांत पाश्चात्य राष्ट्रांतील प्रमुख अर्थशास्त्रज्ञ आणि लोकसंख्याशास्त्रज्ञ ह्यांनीं भाग घेतला. त्या सर्वांच्या मत-प्रदर्शनाचा सूर निराशावादीच होता. अन्न-पुरवठ्याच्या मानानें लोकसंख्या बेसुमार वाढत आहे त्यामुळें भयानक अवस्थेप्रत जग जात आहे, ह्याबद्दल दुमत नव्हतें. त्या दोहोंत समतोलपणा आणण्याचे प्रयत्न विशेष यशस्वी झालेले नाहींत, हेंहि सर्वांनीं मान्य केलें. त्यांतून मार्ग कसा काढावा, ह्याविषयीं मात्र एकवाक्यता नव्हती. सर्वांनींच चिंता आणि असहायता व्यक्त केली. निष्ठूरपणें लोकसंख्या कमी करण्याच्या हिटलरी पद्धतीचा पुरस्कार करण्याचें एका तज्ज्ञानें धाडस केलें.

जगाची आजची लोकसंख्या २०० कोटी आहे, त्यांत दररोज ९०,००० ची भर पडत आहे. वैद्यकाची प्रगति होत राहिल्यास चाळीस वर्षांचे अवधींत सन २,००० अखेर लोकसंख्या ५०० कोटी होईल. सन २,०५० चे सुमारास म्हणजे आजपासून ९० वर्षांनीं ती १,००० कोटी होईल आणि सन २,१०० चे सुमारास ती २,००० कोटींचा आकडा गाठील. अण्वस्त्रांच्या महाभयंकर युद्धांत २० कोटी लोक मृत्यु पावले, तरी त्यांची जागा पांच वर्षांत भरून निघेल.

एका तज्ज्ञाच्या मतें, "मानवजातीचा वांशिक ऱ्हास होण्याचीं आतां लक्षणें आहेत. समाजाला ह्यापुढें अधिकाधिक वेडे, खुळे, गुन्हेगार लोक आणि अपुऱ्या वाढीचे ह्यांना पोसत रहावें लागेल; नीतीचा पाया ढासळून जाईल. मनुष्याचें आयुष्य येन केन प्रकारेण वाढविण्याचा वैद्यक शास्त्राला ध्यासच लागलेला दिसतो. धनुर्वात झालेल्यांना पंधरा-वीस वर्षें ' आयर्न लंग 'च्या यातना सोसाव्या लागतील. दुर्धर रोग झालेल्यांची सुटका करण्यासाठी त्यांना विनायास मरण प्राप्त करून देण्याचा प्रश्न महत्त्व पावत जाईल."

" अविकसित देशांना सध्या जी मदत दिली जाते, तिच्यामुळें श्वेतवर्णीयांचा आत्मनाश होणार आहे; एकूण लोकसंख्येंत त्यांचें प्रमाण उतरत, उतरत चाललें आहे. हिटलरचा मार्ग अटळ तर नाहीं ना ? " असें दुसऱ्या एका तज्ज्ञानें विचारलें. अर्थात्, बाकी सर्व तज्ज्ञांनीं त्याबद्दल नापसंती दर्शविली; पण त्यांतून मार्ग कोणीच दाखवूं शकला नाहीं.

राहणीचें मान सुधारलें म्हणजे जननाचें प्रमाण उतरेल, ह्या रूढ कल्पनेला केंब्रिजच्या सर चार्लस डारविननें विरोध दर्शविला. अविकसित देशांची आर्थिक पातळी वाढली म्हणजे त्यांच्या लोकसंख्येची वाढ एकदम कमी होईल, ह्या आशेचा पायाच त्यांनीं उखडून टाकला; त्यामुळें त्यांनीं रंगविलेलें चित्र भेसूर असेंच आहे. संततिनियमनाचा पुष्कळ प्रसार झाला, तरी चाळीस वर्षांनीं लोकसंख्या ५०० कोटींचे घरांत गेल्याविना राहणार नाहीं, असें त्यांनीं ठासून सांगितलें.

भवितव्य अतिशय चिंताजनक आहे, हें फ्रेंच लोकसंख्याशास्त्रज्ञ एम्. आल्फ्रेड सावे ह्यानें मान्य केलें, परंतु घाबरून जाण्याचें कारण त्याला दिसलें नाहीं. " स्टरिलिटी पिल्स " बद्दल त्यानें गैरविश्वासच दर्शविला. त्या गोळ्यांच्या संभाव्य दुष्परिणामांची छाननी अद्याप झालेली नाहीं. पुढें कांहींहि होवो, आजच्या तातडीच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. पोटभर जेवणाऱ्या निम्म्या जगानें अर्धपोटी बाकीच्या जगाच्या दुःस्थितीकडे सहानुभूतीनेंच पहावें, अशा विचारप्रणालीच्या प्रसाराची आवश्यकता त्यानें प्रतिपादन केली.

एफ. ए. ओ. चे डॉ. ॲक्रॉइड ह्यांच्या मतें जपान आणि हॉलंड देश वगळून बाकीच्या सर्व देशांत खतांच्या वापरानें अन्नाचें उत्पादन ५०%, १००% सुद्धां, वाढवितां येणें शक्य आहे. पण ५० वर्षांत लोकसंख्याहि दुप्पट होणार हें ठरल्यासारखेंच आहे ! म्हणजे, बहुसंख्य अर्धपोटी लोक पुनः अर्धपोटीच राहणार आणि त्यानंतरच्या ५० वर्षांत लोकसंख्या पुनः दुप्पट होणार ! पण, अन्नाचें उत्पादन त्या मानानें वाढण्याची शक्यता आहे, असें कृषितज्ज्ञांना वाटत नाहीं. ह्याचा अर्थ, आज ज्या जिनसांचा अन्न म्हणून उपयोग केला जात नाहीं, त्या कालांतरानें आपल्या अन्नपुरवठ्यांत समाविष्ट होणार. रद्दी कागद, गवत, कृत्रिम अन्न, ह्यांचा वापर अन्नासाठीं केला जाईल, असें कॅलिफोर्नियाच्या प्रो. मार्कनें भाकित केलें.

औद्योगिक उत्पादन ही आर्थिक अभ्युदयाची गुरुकिल्ली आहे, ह्या कल्पनेनें भारतांत शेतीसुधारणा आणि ग्रामीण भागांतील वाहतुकीच्या सोई ह्यांचेकडे दुर्लक्ष झालें आहे. वास्तविक भारतांत धान्योत्पादन वाढण्यास कितीतरी वाव आहे, अशी टीका केंब्रिजच्या प्रो. बावर ह्यानें केली.

अविकसित देशांच्या अन्नपुरवठ्याचा प्रश्न ज्या त्या देशांनींच सोडविला पाहिजे, असें सर्वच तज्ज्ञांचें मत आहे. परदेशी मदत व परदेशी पैसा कुठवर उपयोगी पडणार ? ह्याचा अर्थ, समृद्ध देशांनीं आपल्या डोळ्यांवर कातडें ओढून घ्यावें आणि मदत मुळींच करूं नये, असा मात्र नाहीं. अभागी मानवांना त्यांनीं मदत अवश्य करायला हवी, हें उघड आहे. त्या मदतीनें दीर्घकाल टिकणारा कार्यभाग किती होईल, हा प्रश्न आहेच. तात्कालिक प्रश्न सुटण्यामुळें दीर्घकालीन प्रश्न बिकट होत जातो. त्याला इलाज एकच; एकीकडे अन्नाचें उत्पादन वाढवीत असतांना लोकसंख्या मर्यादित राखण्यासाठीं संततिनियमनाचा प्रभावी प्रचार करणें आणि त्यास राष्ट्रीय धोरणांत अग्रस्थान देणें.

## नव्या कंपन्यांच्या स्थापनेची आंकडेवारी

### प. बंगाल व मुंबई या राज्यांचा पुढाकार

नव्या कंपन्यांच्या स्थापनेस वातावरण अधिक अनुकूल होऊं लागलेलें दिसतें. १९५६ च्या कंपनी कायद्याचा अंमल सुरू झाला, त्या वर्षी नोंदलेल्या नव्या कंपन्यांची संख्या अल्पच राहिली. पुढील वर्षी, अनुभवाचे नंतर, वातावरण सुधारलें आणि तिसऱ्या वर्षी तर भीतीची जागा विश्वासानें घेण्यास प्रारंभ झाला. नव्या कंपन्यांची संख्या वाढली आणि नियोजित नव्या कंपन्यांच्यासाठी उपलब्ध नांवासाठी अर्जांची संख्या चौपट झाली. नव्या कंपन्यांची विभागशः वाटणी खाली दिली आहे :—

| विभाग | १९५६-५७ | १९५७-५८ | १९५८-५९ |
|---|---|---|---|
| पूर्व ( आसाम, बिहार, ओरिसा, प. बंगाल, मणिपूर, त्रिपुरा ) | ३३४ | ४०० | ४२४ |
| पश्चिम ( मुंबई, मध्यप्रदेश ) | १७५ | १९८ | २५४ |
| उत्तर ( पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश, दिल्ली, हिमाचल प्रदेश ) | १९२ | १९१ | २११ |
| दक्षिण ( आंध्र प्रदेश, केरळ, मद्रास, म्हैसूर ) | १४७ | १७२ | २०६ |
| एकूण | ८४८ | ९६१ | १,०९५ |

नवीन कंपन्या मुख्यतः प. बंगाल, मुंबई, मद्रास आणि दिल्ली ह्या चार राज्यांतच केंद्रित होत आहेत. तेथील नव्या कंपन्यांचा तपशील येथें दिला आहे :—

| राज्य | १९५६-५७ | १९५७-५८ | १९५८-५९ |
|---|---|---|---|
| प. बंगाल | ३०१ | ३५९ | ३६४ |
| मुंबई | १७० | १९१ | २४० |
| मद्रास | ९१ | ८० | ११३ |
| दिल्ली | ११२ | ११७ | १३० |
| एकूण | ६७४ | ७४७ | ८४७ |
| सबंध भारतांतील नोंदींशीं प्रमाण (%) | ७९.५ | ७७.७ | ७७.४ |

नव्या कंपन्या मुख्यतः औद्योगिक उत्पादनासाठी निघत आहेत. व्यापार आणि वाहतूक ह्यांचे मानानें औद्योगिक उत्पादनाची होत असलेली प्रगति त्यावरून दिसून येते.

एकूण कंपन्यांत लहान ( १० लक्ष रुपयांपेक्षा कमी अधिकृत भांडवलाच्या ) कंपन्यांचें प्रमाण मोठें असतें आणि लहान कंपन्या बहुंशीं प्रायव्हेट लिमिटेड असतात. १९५८-५९ चे आंकडे येथें दिले आहेत :—

| कंपन्यांचा आकार ( अधिकृत भांडवल ) | १९५८-५९ पब्लिक | प्रायव्हेट |
|---|---|---|
| १ लक्ष रुपयांखाली | ३ | २४९ |
| १ लक्ष ते ५ लक्ष रुपयांपर्यंत | १४ | ४२८ |
| ५ लक्ष ते १० लक्ष रुपयांपर्यंत | १२ | २६२ |
| १० लक्ष ते २५ लक्ष रुपयांपर्यंत | ८ | ५५ |
| २५ ते ५० लक्ष रुपयांपर्यंत | ५ | १९ |
| ५० ते १०० लक्ष रुपयांपर्यंत | ७ | ११ |
| १०० लक्ष रु. व त्यावर | ९ | १३ |
| | ५८ | १,०३७ |
| लहान कंपन्यांचें एकूण कंपन्यांशीं प्रमाण (%) | ५०.५ | ९०.५ |

नवी कंपनी नोंदण्यापूर्वी, त्याच नांवाची दुसरी एखादी कंपनी नोंदलेली किंवा नोंदण्यासाठी आलेली नाहींना, ह्याची माहिती घेण्यासाठी कंपन्यांचे प्रवर्तक अर्ज करतात. अशा अर्जांची संख्या १९५६-५७ मध्यें १,२९६ होती, ती १९५८-५९ मध्यें ४,१३२ भरली. ह्यावरून, नव्या कंपन्या काढण्यासाठी लोकांत उमेद कशी वाढत आहे, तें प्रत्ययास येतें.

---

## गिऱ्हाइकांची टेलिफोनवरून चौकशी

### तुमच्या मुखानें बँक बोलत असते, लक्षांत ठेवा

टेलिफोनची घंटी वाजते. तुम्हीं रिसीव्हर उचलून बोलूं लागता. एखाद्या गिऱ्हाइकाला कांहीं माहिती हवी असते. ह्या अदृश्य माणसांशीं तुम्हीं बोलतां, तेव्हां त्याच्या दृष्टीनें तुम्हींच ' बँक ' असतां, हें विसरतां कामा नये.

तुमच्या अनुभवावरून हें खरें असल्याचें तुम्हीं जाणतां. तुम्हीं एखादी कंपनी, सिनेमागृह, दुकान, इथें फोन केला म्हणजे टेलिफोनवरून तुमच्याशीं बोलणाऱ्या माणसाच्या पद्धतीवरून तुम्ही त्या फर्मविषयीं मत बनवितांच कीं नाहीं !

टेलिफोनवरती बोलत असतांना, तुम्हीं तुमच्या सबंध बँकेचें प्रतिनिधित्व करीत असतां, हें विसरूं नका. टेलिफोनची घंटी वाजणें, ह्याला व्यत्यय समजूं नका; उलट धंदा वाढविण्याची ती संधि असते.

#### हें करा

टेलिफोनवरून अनुकूल-प्रतिकूल ग्रह कसे बनतात ? आवाजावरून. मित्रत्वाच्या शब्दांचा परिणाम अनुकूल होतो. आवाजांत त्रस्तता किंवा कंटाळ्याचा सूर असला, तर ऐकणाराचा ग्रह प्रतिकूल होतो. बोलणें स्पष्ट असावें, नीट ऐकूं जाईल असें बोलावें. बोलतांना ऐकणाराच्या कामावर लक्ष केंद्रित करावें. उडत उडत बोलूं नये. गिऱ्हाइकाला त्वरेनें, बिनचूक आणि पुरीं उत्तरें हवीं असतात. तुम्हांला माहिती देतां आली नाहीं, तर ती जो पुरवूं शकेल अशाकडे त्याला फोन करायला सांगा. त्याच्या अपेक्षेपेक्षाहि जास्त कांहींतरी करा; तो मागेल त्यापेक्षा थोडी अधिक माहिती पुरवा. टेलिफोनवरून चर्या दिसली नाहीं, तरी तुमची वृत्ति लपूं शकत नाहीं, हें लक्षांत ठेवा.

तुम्हीं कोण आहांत, तें प्रथमच स्पष्ट करा. टेलिफोनवर बोलत असतांना बेरजा करीत राहूं नका. कांहीं वेळ लागणार असेल, तर गिऱ्हाइकाचा नंबर टिपून घ्या आणि त्याला पुन्हां फोन करा. विवक्षित व्यवहार महत्त्वाचा आहे, असें मानून कृति होऊं द्या; गिऱ्हाइकाला तो व्यवहार महत्त्वाचा असतोच. त्याखेरीज त्यानें फोन केलाच नसता. माहिती मागाहून पुरविण्याचें फोनवर आश्वासन दिलें तर तें अवश्य पाळा; वेळ मारून नेऊं नका.

#### हें नको

दुसरा एखादा गिऱ्हाइकाचें काम करूं शकेल, ह्याची खात्री असल्याखेरीज त्यांचेकडे फोन देऊं नका. जरूरीप्रमाणें गिऱ्हाइकाला थोडा वेळ फोन धरून ठेवायला सांगा. फोनवरून कोण बोलत आहे, ह्याची खात्री करून घेतल्याखेरीज वैयक्तिक किंवा खासगी माहिती सांगूं नका. फोन करणाराची ओळख पटली नाहीं, तर त्याचा नंबर विचारून घ्या, खात्री करून घ्या आणि त्या नंबरावर फोन करा. चिडखोरपणा करूं नका, वाद घालूं नका. तोडून बोलूं नका. कोणत्याहि चौकशीचें महत्त्व कमी लेखूं नका. किरकोळ गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यानें मोठ्या धंद्याला मुकण्याची पाळी येते!

## पोलादाच्या कारखान्यांसाठी लागणारे एंजिनिअर्स

भारतांत उभारल्या जाणाऱ्या पोलादाच्या कारखान्यांसाठी लागणारे तज्ज्ञ एंजिनिअर्स परदेशांतून शिकवून आणण्यांत येत आहेत. सार्वजनिक मालकीच्या विभागांतील तिन्ही पोलादाचे कारखाने चालविण्यासाठी सुमारें २,००० एंजिनिअर्स व १९,००० कुशल तंत्रज्ञ लागतील असा अंदाज करण्यांत आलेला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत ह्या कारखान्यांचा विस्तार करण्यांत येणार आहे. तरीसुद्धां आतां पूर्वीइतके एंजिनिअर्स अगर तंतज्ञ लागणार नाहींत. कारण, ह्या कारखान्यांच्या मूळच्या उत्पादनक्षमतेच्या मानानें विस्ताराच्या योजना फारशा मोठ्या नाहींत. शिवाय विस्ताराच्या योजनांच्या प्रमाणांत वाढता नौकरवर्ग लागेल असें नाहीं. गेल्या महिन्यापर्यंत भारतामधून शिक्षणासाठी परदेशांत पाठविलेल्या एंजिनिअर्सची संख्या १,१३७ होती. त्यांपैकीं ३९१ अमेरिकेला, ३५० रशिआला, २२७ ब्रिटनला, १२३ पश्चिम जर्मनीला, ४५ ऑस्ट्रेलिआला व १ कॅनडाला, असें पाठविण्यांत आले होते. ८८० एंजिनिअर्स आपलें शिक्षण पूर्ण करून परतले होते. मोठ्या संख्येनें लागणाऱ्या तंत्रज्ञांचें शिक्षण भारतांतच पूर्ण करण्यांत येतें. त्यांच्यापैकी अवघ्या ३९२ लोकांना परदेशी म्हणजे रशिआला पाठविण्यांत आले होते. आतां ह्यापुढें मात्र भारतामधून फारच थोड्या एंजिनिअर्सना शिकण्यासाठी परदेशीं पाठविण्यांत येणार आहे. भारतामध्यें उभारण्यांत आलेल्या अगर यावयाच्या पोलादाच्या कारखान्यांतील यंत्रसामुग्री व उत्पादन पद्धति इतकी आधुनिक आहे कीं नव्या एंजिनिअर्सचें शिक्षण त्या कारखान्यांत होऊं शकेल. फक्त ज्या कामासाठी विशेष प्रकारच्या शिक्षणाची जरूरी आहे, अशाच कामासाठी अगदीं मोजक्या एंजिनिअर्सना परदेशीं पाठविले जाईल.

---

## खताचे कारखाने काढण्यास अमेरिकेची मदत

हिंदचे अन्नमंत्री श्री. स. का. पाटील अमेरिकेच्या दौऱ्यावर ले असतांना व्यापार व उद्योगखात्याचे उपमंत्री श्री. सतीश चंद्र हे त्यांच्याबरोबर त्यांना मदत करण्यासाठी गेले होते. दौऱ्यांतील आपल्या अनुभवाविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं, भारतांत रासायनिक खताचे कारखाने काढण्याच्या कामीं अमेरिकेंतील खाजगी मालकीचें भांडवल तयार आहे. भारताची खताची गरज आणि उत्पादन ह्यासंबंधी अभ्यास करण्यासाठी एखादें अभ्यास-मंडळहि अमेरिकन कारखानदार पाठविण्याची शक्यता आहे. रासायनिक खतांच्या किंमती ठरविण्याबाबतत भारत सरकारचें धोरण काय राहील ह्याविषयीं अमेरिकेंत बरीच जिज्ञासा दिसून आली. त्याचप्रमाणें भारतामधील सार्वजनिक मालकीचा विभाग आणि खाजगी मालकीचा विभाग ह्यांच्यामधील परस्पर संबंधावर अधिक प्रकाश टाकण्यांत आला तर तो त्यांना हवा आहे. खताच्या कारखान्यांच्या उत्पादनाचें एकत्रीकरण करून खताच्या किंमती ठरविण्याच्या पद्धतीला त्यांचा विरोध दिसून आला. प्रत्येक कारखान्याला वाजवी किंमती ठरविण्याची मुभा असावी असें त्यांचें मत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भारतांत खताच्या उत्पादनावर विशेष भर देण्यांत येणार असल्यानें त्यांचें उत्पादन झपाट्यानें वाढेल. तेव्हां सर्व कारखान्यांच्या उत्पादनाचा साकल्यानें विचार करून किंमती ठरविण्याचें कारणच पडणार नाहीं असा त्यांचा दावा आहे. शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी रासायनिक खतांची फार आवश्यकता असल्यानें भारत सरकार खतांच्या किंमतीबद्दल लवचिक धोरण स्वीकारण्याचा संभव आहे. त्यामुळेंच देशहित साधण्याचा अधिक संभव आहे.

## कोळशाचें उत्पादन वाढविण्यासाठी तज्ज्ञांचा सल्ला

भारतामधील दगडी कोळशाचें उत्पादन वाढविण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें परदेशीय तज्ज्ञांचें साह्य घेण्याचें ठरविलें आहे. ह्या तज्ज्ञांत रशिआ, ब्रिटन, पश्चिम जर्मनी, फ्रान्स व अमेरिका ह्या देशांतील तज्ज्ञ आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कोळशाच्या उत्पादनाचें उद्दिष्ट ६ कोटी टन ठरविण्यांत आलें होतें. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस ते ९.५ कोटी टनापर्यंत वाढविण्याचा सरकारचा इरादा आहे. हें साध्य करण्यासाठी काय उपाय योजावेत ह्यासंबंधीं परदेशीय तज्ज्ञांच्या शिफारसी मागविण्यांत येणार आहेत. कोळशाच्या उत्पादनवाढीच्या प्रश्नाचें स्वरूप समजावून घेण्यासाठी वरील देश आपआपला एक प्रमुख अधिकारी भारत सरकारशीं प्राथमिक बोलणीं करण्यासाठी पाठविणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ३.५ कोटी टन अधिक कोळसा उत्पादन करण्यांत येणार आहे. त्यापैकीं १.९ कोटी टन कोळसा सरकारी मालकीच्या कोळसाखाणींकडून उत्पादन करवून घेण्यांत येईल. बोकॅरो येथें भारतामधील चवथा पोलादाचा कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यासाठी लागणारा कोळसाहि सार्वजनिक मालकीच्या विभागांतूनच उत्पादन केला जाणार आहे. कोळशाच्या खाणींचा अधिक उत्पादनाच्या दृष्टीनें विकास करण्याची एक योजना तयार करण्यांत आली आहे. तिच्या अंमलबजावणीसाठी सुमारें १४० कोटी रुपये खर्च येईल. तिच्या पंचवार्षिक कार्यक्रमांत खाजगी मालकीच्या खाणींमधून १.६ कोटी टन उत्पादन व्हावें असें ठरविण्यांत आलेलें आहे. पण हें उद्दिष्ट त्यांना गाठतां येईल किंवा नाहीं हें अद्याप स्पष्ट झालेलें नाहीं. ह्या बाबतींत खाजगी खाणमालकांची सरकारशीं बोलणीं चालू आहेत.

---

## नव्या उद्योगधंद्यांच्या वितरणाचें धोरण

मध्यवर्ती सरकारचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा वारंगळ येथें एका औद्योगिक वसाहतीचें उद्घाटन करतांना म्हणाले कीं, सध्यां भारतामधील निरनिराळीं राज्यें औद्योगिकदृष्ट्या वेगवेगळ्या पातळीवर आहेत. औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीनें निरनिराळ्या राज्यांत जी तफावत दिसून येते ती कमी करण्याच्या दृष्टीनें सरकार ह्यापुढें पावलें टाकणार आहे. विशेषतः नव्या उद्योगधंद्यांची उभारणी करतांना सर्व देशभर त्यांचीं पसरण कशी करतां येईल ह्याचा विचार करण्यांत येणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत विजेची भारी यंत्रसामुग्री तयार करण्याचे आणखी दोन कारखाने काढण्याचा सरकारचा इरादा आहे. त्यांपैकी एक कारखाना रशिआच्या मदतीनें व दुसरा झेकोस्लोव्हाकिआच्या मदतीनें काढण्यांत येण्याचा संभव आहे. अशा प्रकारचा पहिला कारखाना भोपाळ येथें उभारण्यांत आलेला आहे.नवीन कारखान्यांच्या जागा अद्याप निश्चित करण्यांत आलेल्या नाहींत. पण त्या निश्चित करतांना निरनिराळ्या राज्यांच्या औद्योगिक प्रगतीमधील तफावत दृष्टीसमोर ठेवण्यांत येईल. रशिआच्या तांत्रिक सहकार्यानें भारतांत औषधांचे पांच कारखाने काढण्यांत येणार आहेत. त्यांपैकीं एक हैद्राबाद येथें काढण्यांत येत आहे. बाकीचे चार कारखाने काढण्यांत आले म्हणजे देशांत दरसाल १८० कोटी रुपये किंमतीचीं औषधें तयार होऊं लागतील. छोट्या उद्योगधंद्यांचा विकास होण्यास मदत व्हावी म्हणून हैद्राबाद येथें एक मध्यवर्ती संस्था स्थापन करण्यांत येणार आहे. छोट्या उद्योगधंद्यांना लागणारे तंत्रज्ञ शिकवून तयार करण्याचें व सल्ला देण्याचें काम संस्थेतर्फे करण्यांत येईल.

## महाराष्ट्र रिजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें १.

(नं. १० बी. जे. रोड, टाटा लॉज्, पुणें १.)

**को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षा—मार्च १९६० चा रिझल्ट**

(२५ वा शिक्षणवर्ग)

खालील विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत :—

**दुसरा वर्ग**

डी. आयू. गाढवी, वी. वी. आपुणे, व्ही. पी. जोशी, कु. सुशिला हिरालाल शुक्ल, आर. एस्. सावंत

**तिसरा वर्ग**

कु. प्रमोदिनी शंकर दुर्वे, बी. पी. पटवर्धन, पी. आर. पोरवाल, जी. पी. तिवारी, डी. एन्. भोसले, ए. आर. कुलकर्णी, (अरूण रा.) के. पी. पोंक्षे, एम्. जे. बडवे, एस्. एस्. दरेकर, एन्. एस्. दीक्षत, एम्. डी. गायकवाड, एन्. आर. गायकवाड, सी. सी. गानू, एस्. बी. गुंड, के. ए. हांडे, यू. जी. इंपाळ, ए. ए. जगदाळे, वाय. जी. जगताप, जी. डी. काळे, ए. आर. कुलकर्णी, (अच्युत रा.), एम्. वी. कुलकर्णी, एस्. व्ही. कुलकर्णी, टी. आर. कुलकर्णी, आर. बी. कुंभार, पी. एस्. महाले, एस्. पी. म्हसदे, एच्. एस्. मोरे, एस्. आर. पाटील, एस्. व्ही. पाटील, एम्. एम्. साळुंखे, ए. एन्. सय्यद, ए. व्ही. शहाणे, एल्. एन्. तांबे, डी. बी. टाव्हरे, आयू. बी. व्हंडरे, ए. बी. विश्वासराव, एच्. एन्. देशमुख, एस्. डी. देशपांडे, एस्. डी. नगरकर, एस्. व्ही. नाचण, डी. जे. पाटील, जी. डी. वाघमारे, जी. एस्. वाघमारे, जे. डी. यादव, एन्. व्ही. साने, एम्. आर. बाठे, डी. एस्. देशमूख, व्ही. वायू. कवठेकर, टी. जे. म्हात्रे, आर. डी. शेटे, एस्. यू. सोनवणे, व्ही. एच्. निमोणकर.

**पारितोषिकें**

पुढील विद्यार्थ्यांनीं अनुक्रमें पहिल्या व दुसऱ्या क्रमाकांचें पारितोषिक मिळविलें आहे :—

| पारितोषिकाचें नांव | विद्यार्थ्यांचें नांव | बक्षिसाची रक्कम |
|---|---|---|
| (१) सर जनार्दन ए. मदन पारितोषिक. | श्री. व्ही. जोशी, | रु. २५ |
| (२) बॉम्बे को-ऑप. इन्शुअरन्स सोसायटी पारितोषिक | श्री. आर. एस्. सावंत. | रु. १५ |

आर. पी. देशमूख,
प्रिन्सिपॉल,
महाराष्ट्र रिजनल को-ऑप., स्कूल, पुणें १.

---

**गुजरातमधील वीजपुरवठा**—गुजरात वीज बोर्डानें राज्यांतील ५० खेड्यांना लवकरच विजेचा पुरवठा करण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकीं १३ खेडीं भडोच विभागांतील आहेत. त्याचप्रमाणें राज्यांत नव्यानें निघणाऱ्या उद्योगधंद्यांनाहि बोर्डातर्फे वीज पुरविण्यांत येणार आहे. कांहीं खेड्यांना साबरमती वीज-केंद्रांतून पुरवठा केला जाईल.

**रशिआच्या तुरुंगांतील अमेरिकन वैमानिक**—रशिअन प्रदेशावरून हेरगिरी करणाऱ्या अमेरिकन वैमानिकाला तुरुंगांत चांगली वागणूक देण्यांत येत आहे. त्यानें आपल्या पत्नीस लिहिलेल्या पत्रांत तसें म्हटलें आहे. आपली प्रकृति चांगली असून करमणुकीसाठी पुस्तकेंहि मिळतात असें त्यानें पत्रांत कळविलें आहे.


नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

# दि बेळगांव बँक लिमिटेड

**बेळगांव**

(शेड्यूल्ड बँक)

**स्थापना १९३०**

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्ये, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंग्जचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

**दि बेळगांव बँक लिमिटेड.**

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर



# भोर स्टेट बँक लि.

(स्थापना १९४४)

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

(—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—)

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष

रावसाहेब य. द. खोले — श्री. चं. रा. राठी

श्री. गो. बा. देवी — श्री. बा. ग. धंदुके

### बँक ट्रायब्यूनलचा निवाडा सहा महिन्यांत होणार

नॅशनल इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनल (बँक डिस्प्यूट्स) ला म्हणजे न्यायमूर्ति के. टी. देसाई, ह्यांना आपला अहवाल सरकारला सादर करायला सुमारें सहा महिने लागतील.

**'इंटेरिम रिलीफ'**

६७ बँकांचे बाबतींत 'इंटेरिम रिलीफ' द्यावयाचा किंवा नाहीं; द्यावयाचा ठरलें तर किती द्यावा, ह्यासंबंधीं चौकशी सोमवार दि. २० रोजीं ट्रायब्यूनलनें मुंबई येथें सुरू झाली आहे. मागाहूनच्या १७ बँकांच्या बाबतींत चौकशी ४ जुलै रोजीं सुरू होईल. रिझर्व्ह बँकेच्या बाबतींतली चौकशी २७ जूनला सुरू होईल.

**मुख्य मागण्या**

मुख्य मागण्यांचे बाबत चौकशा ८४ बँका (६७+१७) व रिझर्व्ह बँक ह्यांचे संबंधांत अनुक्रमें २० जुलै व २३ जुलै रोजीं सुरू होतील, व त्या चौकशा तीन महिने चालू रहातील, असा अंदाज आहे. बँकांची वर्गवारी, पगाराचें मान, पगारवाढ, महागाई भत्ता (सध्यांच्या महागाईभत्त्यापैकीं कांहीं भत्त्याचें पगारांत रूपांतर करावें काय?), घरभाडें, व इतर भत्ते, प्रवास भत्ता, रजेच्या वेळीं भाड्यासाठी सवलती, पेन्शन, ग्रॅच्युइटी, रजेचे नियम, कामाचे तास, ओव्हरटाइम काम, वैद्यकीय मदत, इत्यादि प्रश्नांचा मुख्य मागण्यांत समावेश आहे.

नोकरांनीं आपल्या मागण्या ट्रायब्यूनलकडे नोंदवाव्या व त्याची प्रत संबंधित बँकांकडे पाठवावी, असें सरकारनें कळविलें होतें. ह्या मागण्यांबाबत आपलें म्हणणें कळविण्याबाबत बँकांना सूचना देण्यांत आली होती.

---

**डॉ. सांडू ह्यांचा मृत्यु**

'सांडू ब्रदर्स'चे डॉ. श्रीधर वासुदेव सांडू हे मुंबई येथें वयाच्या ४५ व्या वर्षीं मृत्यु पावले.

**तुमचे जवळ सायकल आहे काय!**

वरील विषयावर श्री. श्री. वा. काळे ह्यांनीं लिहिलेला कार्यक्रम पुणें नभोवाणीवरून सोमवार, दि. २७ रोजीं रात्रीं ९-२० वाजतां ध्वनिक्षेपित होईल.

**"युनायटेड महाराष्ट्र"**

वरील नांवाचें एक इंग्रजी मासिक श्री. डी. सी. पाटोळे (बॉंबे क्रॉनिकलचे एक भूतपूर्व संपादक) ह्यांनीं सुरू केलें आहे, त्याचा पहिला अंक प्रसिद्ध झाला आहे. नव्या महाराष्ट्राच्या आकांक्षा-अपेक्षा व्यक्त करणें, हा प्रस्तुत प्रकाशनाचा उद्देश आहे. महाराष्ट्रीय संस्कृति महाराष्ट्रीयेतरांना समजावून सांगण्याचें कार्य हें मासिक उत्कृष्ट रीतीनें करूं शकलें आणि त्यामुळें महाराष्ट्राविषयीं इतरांची अढी किंवा गैरसमज दूर होण्यास मदत होईल. पहिल्या अंकास मुख्य मंत्री श्री. चव्हाण ह्यांनीं संदेश पाठविला असून श्री. ए. डी. गोरवाला, श्रीमति ताया झिंकिन, श्री. एन्. दांडेकर, इत्यादींचे लेख अंकांत आहेत.

---

**व्हीं. टी. कृष्णम्माचारी ह्यांची निवृत्ति**

पहिल्या तीन पंचवार्षिक योजना तयार करणाऱ्या नियोजन मंडळाचे गेलीं दहा वर्षें डेप्युटि चेअरमन असलेले श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारी १८ जून रोजीं निवृत्त झाले.

**श्री. बी. वेंकटप्पय्या**

श्री. बी. वेंकटप्पय्या ह्यांना रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटि गव्हर्नराचे जागीं आणखी पांच वर्षांकरितां नेमण्यांत आलें आहे.

---

**अणुशक्तीवर चालणारी बोट**—पश्चिम युरोपांतील युरेटॉम ह्या संघटनेसाठी अणुशक्तीवर चालणारी एक बोट पश्चिम जर्मनी बांधणार आहे. ह्या संघटनेंत पश्चिम जर्मनी, फ्रान्स, इटली, बेल्जम, हॉलंड व लक्झेंबर्ग हीं राष्ट्रें आहेत. जर्मन एंजिनिअर्सनीं संकल्पित बोटीची प्रतिकृति तयार केली असून बाकीचें तांत्रिक काम लवकरच चालू करण्यांत येईल.

**सरकारी नौकरांना इषारा**—जे सरकारी नौकर आपल्या बायकामुलांची योग्य काळजी घेत नाहींत त्यांच्याविरुद्ध उपाय करण्यांत येण्याचा संभव आहे, असा इषारा राजस्थान सरकारनें दिला आहे. अशा नौकरांविरुद्ध खात्यातर्फें इलाज करण्यांत येणार आहे. सरकारी नौकरांच्या अशा वागण्यामुळें नौकरवर्गाची नाचक्की होते असें सरकारचें मत आहे.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

• शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

: भांडवल :

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | ... | रु. ३१,००,००० |
| गंगाजळी व इतर निधी | | ... | रु. १४,६०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | | ... | रु. १५ कोटींचे वर |

: बँकेच्या ५२ शाखा :

अकोला, अकलूज, अमरावती, अहमदनगर, औरंगाबाद, बार्शी, बेळगांव, मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर = ३ शाखा, जव्हेरी बझार, मराठा मंदिर, शीव, वरळी, विलेपार्लें) भिवंडी, चाळीसगांव, धुळें, हरिहर, हिंगोली, हुबळी, द. हैद्राबाद, जळगांव, जालना, कल्याण, किर्लोस्करवाडी, कोल्हापूर, कोपरगांव, खामगांव, लातूर, मोमिनाबाद, नागपूर, नांदेड, नाशिक, पनवेल, पुणें (भवानी पेठ, डे. जिमखाना, खडकी, सोमवार पेठ, टिळक रोड, शिवाजीनगर व गणेशखिंड) परळी वैजनाथ, रत्नागिरी, सांगली, सोलापूर, (फलटणगल्ली व मोरारजी पेठ) श्रीरामपूर, ठाणें व यवतमाळ.

मुख्य कचेरी
बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग
मॅनेजर.

स्थापना १९३६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस :

पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नाशिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण, १२. अकलूज.

३१ डिसेंबर, १९५९

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७५,००० |
| ठेवी | रु. | १,८८,९१,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,१७,१५,००० |

मुदत ठेवींवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे | दहा वर्षे |
|---|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·२५ | रु. ३·५० | रु. ४·०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | १·५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०·५० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : २४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींच्या दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१–७–५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.

( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :

भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष
मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष

रु. १ कोटी, २५ लक्ष

गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष

एकूण ठेवी : रु. १२ कोटी

खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर

'१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

## बँक ऑफ पूना, लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. ११,५०,००० |

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन ( संचालक, सकाळ )
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अल्प मुदत ठेवींवर आकर्षक व्याज.

...शाखा...

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस : ४५९ रविवार पेठ, पुणें

गो. गं. साठे
मॅनेजर

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.